# जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव

---

**क्रमांक-अस्थाप-६/कावी/२७७/२०१०** **दिनांक २४.०५.२०१०**

---

## <u>प्रेस नोट</u>

जळगांव जिल्हयातील उपविभागीय अधिकारी, यांचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरणेकामी दिनांक ०८.१२.२००९ रोजी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती सदर जाहीरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जानुसार लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या याद्या तसेच अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या याद्या दिनांक २४.०५.२०१० रोजी www.jalgaon.gov.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. लेखी परिक्षेकामी अपात्र ठरलेल्या उमेदवारांना याबाबत काही हरकत घ्यावयाची असेल / पात्र उमेदवारांना त्यांच्या तपशिलात काही सुधारणा करावयाची असेल त्यांनी आपल्या हरकती / अर्ज दिनांक ३१.०५.२०१० रोजी संध्याकाळी ६.०० वाजे पावेतो लेखी स्वरुपात या कार्यालयाचे आस्थापना शाखेत समक्ष / अथवा उपरोक्त नमुद कालावधीत पोहचतील अशा बेताने पोष्टाने सादर कराव्यात. दिनांक ३१.०५.२०१० रोजी संध्याकाळी ६.०० वाजेनंतर प्राप्त झालेल्या हरकत अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. पोष्टाचे कारणास्तव उशिराने प्राप्त झालेल्या हरकत अर्जाचा देखील विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

प्राप्त झालेल्या हरकत अर्जानुसार मुळ अर्जाची फेरपडताळणी करुन याबाबत हरकत अर्जावर निर्णय घेण्यात येईल व घेण्यात आलेला निर्णय www.jalgaon.gov.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. हरकती बाबत कोणासही लेखी स्वरुपात काहीही कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत /--**
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती**
**जळगांव करीता**

म.अध्यक्ष जि.नि.स.
यांचे मंजुरीने

प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, जळगांव
२/- सदर प्रेसनोट जिल्हयातील सर्व दैनिकातुन दिनांक २५.०५.२०१० रोजी विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती**
**जळगांव करीता**